## प्रकरण सहावे :

# उपसंहार

## प्रकरण सहावे

## उपसंहार

### प्रस्तावना

प्रस्तुत शोध-निबंधामध्ये दलित मुक्तीच्या राजकारणाचा अभ्यास करण्यात आला आहे· डॉ·बाबासाहेब आंबेडकरांनी भारतातील जातीव्यवस्था आणि वर्ग व्यवस्था यांनी गुलाम केलेल्या दलितांच्या मुक्तीचे आंदोलन छेडले· त्यासाठी त्यांनी स्वतःची अशी एक व्यूहनीती आखली· बाबासाहेबांच्या निर्वाणानंतर त्यांच्या विचाराच्या अनेक पक्ष व संघटना स्थापन झाल्या· त्याचाही या ठिकाणी अभ्यास करण्यात आला आहे· सदर शोध-निबंधाचे काम करीत असताना बाबासाहेबांचे विचार व चळवळी आणि त्या अनुषंगानेच नंतरच्या काळात निर्माण झालेल्या दलित चळवळींचा विचार केला आहे· जो पर्यन्त दलितांमध्ये आत्मसन्मानाची जाणीव आणि जागृती निर्माण होत नाही, तोपर्यंत ते आपल्या मुक्तीसाठी प्रयत्न करणार नाहीत· महात्मा फुल्यांनी स्त्री शूद्रातिशूद्रांना जागृत करण्याचा प्रयत्न केला· त्यांच्या जागृतीसाठी फुल्यांनी शैक्षणिक व सामाजिक प्रगतीवर भर दिला· बाबासाहेबांनी महात्मा फुल्यांना गुरू मानून त्याच मार्गाचा अवलंब आपल्या राजकीय व्यूहनीतीमध्ये केला· बाबासाहेबांनंतर त्यांच्या चळवळीचा मार्ग दलित समाजाने स्वीकारला· 1957 पासून ही दलित चळवळ वेगवेगळ्या टप्प्यावर कार्य करताना दिसते·

### सारांश

डॉ·बाबासाहेब आंबेडकरांची राजकीय व्यूहनीती या पहिल्या प्रकरणात डॉ· बाबासाहेबांच्या राजकीय व्यूहनीतीचा सविस्तर अभ्यास करण्यात आला आहे· बाबासाहेबांनी

1923 पासून वेगवेगळ्या पातळ्यावर दलित मुक्तीसाठी प्रयत्न केले आहेत· स्वातंत्र्यपूर्व काळात व स्वातंत्र्यानंतर अशा दोन पातळ्यांवर बाबासाहेबांनी आपली राजकीय व्यूहनीती विकसित केली· त्यांच्या राजकीय व्यूहनीतीमध्ये राजकीय जागृतीला आणि राजकीय संघटनाला महत्त्वाचे स्थान होते· बहिष्कृत हितकारिणी सभा, स्वतंत्र मजूर पक्ष, शेडयूल्ड कास्ट फेडरेशन यासारखे पक्ष स्थापन करून त्यांनी दलितांची शक्ती संघटित केली· स्वातंत्र्यपूर्व काळात सवर्ण हिंदू धर्मीय आणि इंग्रज या दोहोंशी त्यांनी एकाच वेळी लढा देऊन दलितांसाठी हळू हळू सवलती मिळविल्या· स्वतंत्र मजूर पक्षाच्या माध्यमातून त्यांनी दलितांसह सर्व शोषित, श्रमिक, कष्टक-यांना एकत्र केले· त्यांच्या मजूर पक्षाने 1937 च्या निवडणूकीत चांगले यशही मिळविले· मजूर पक्षाची स्थापना करून त्यांनी जाती-लढयाबरोबर वर्ग लढाही दिला· बदलत्या राजकीय परिस्थितीशी मिळते जुळते घेत असताना त्यांनी मजूर पक्ष बरखास्त करून तमाम दलितांचे संघठन करण्याचा प्रयत्न केला· त्यासाठी त्यांनी शेडयूल्ड कास्ट फेडरेशनची स्थापना केली· दबाव तडजोड दबाव या माध्यमातून त्यांनी दलितांना कायदेमंडळात राखीव जागा, नोक-यांमध्ये राखीव जागा मिळवून दिल्या· स्वातंत्र्यानंतर कायदा मंत्री असताना स्त्रियांना पुरूषाबरोबर अधिकार मिळावेत यासाठी हिंदू कोड बिल संसदेत आणले पण हे बिल जसेच्या तसे मंजूर न झाल्याने त्यांनी मंत्रीपदाचा राजीनामा दिला· प्रस्थापित समाजव्यवस्था दलितांना त्यांचे मानवी मूलभूत हक्क देत नाही, त्यांना माणसासारखी वागणूक मिळत नाही, त्यांना कायदेशीर संरक्षण नाही· हे बाबासाहेबांच्या लक्षात येत होते· भारताची घटना निर्मिती करत असताना त्यांनी दलितांना घटनेत कायदेशीर संरक्षण दिले· ससंदीय राजकारणात राहून संसदीय व्यवस्थेच्या बाहेर संघर्षाची भूमिका ते घेत होते· शे·का·फे·सर्वसमावेशक होऊ शकत नाही· त्याला इतर जात, वर्ग पाठिंबा देत नाही हे बाबासाहेबांच्या लक्षात आल्यावर सर्वसमावेशक असा, सर्व दलितांना बरोबर घेऊन जाणारा नवा पक्ष रिपब्लिकन पक्षाचा आराखडाही त्यांनी तयार केला होता· पण त्यांच्या हयातीत हे कार्य होऊ शकले नाही· बाबासाहेबांनी स्वातंत्र्यपूर्व काळात व स्वातंत्र्यानंतर दलितांमध्ये अस्मिता निर्माण करण्याची जी चळवळ केली ती आत्मोध्दाराची चळवळ होती असे म्हणावे लागेल· दलितांनी आपला विकास

आपणच केला पाहिजे यासाठी सामाजिक प्रतिकार करावा, संघटित सामर्थ्याद्वारे आत्मतेज जागे करावे असे त्यांचे मत होते·

रिपब्लिकन पक्षाच्या राजकीय व्यूहनीतीचा अभ्यास दुस-या प्रकरणात करण्यात आला आहे· डॉ·बाबासाहेब आंबेडकरांच्या निर्वाणानंतर म्हणजेच 1957 मध्ये त्यांना अपेक्षित असणारा रिपब्लिकन पक्ष त्यांच्या अनुयायांनी स्थापन केला· 1957 ला स्थापन झालेला हा पक्ष एक-दीड वर्षातच दुरूस्त व नादुरूस्त अशा गटात विभागला· पुढे 1959 नंतर तर या पक्षात मोठया प्रमाणावर फूट पडत गेली· परंतु 1957 ते 1972 या काळाचा विचार करता असे दिसते की, रिपब्लिकन पक्ष गटागटात विभागला जात होता तरी या पक्षाने दलित मुक्तीच्या राजकारणात विविध आघाडयावर दलितांच्या मूलभूत प्रश्नावर जनआंदोलने उभी केली· दलितांवरील अत्याचार, दलित-बौध्दांना सवलती, भूमिहिनांचा सत्याग्रह यासाठी जे लढे दिले त्यामुळे दलितांमध्ये जागृती व आत्मसन्मानाची भावना निर्माण झाली· सत्ता हे समाज परिवर्तन महत्त्वाचे साधन मानून रिपब्लिकन पक्षाने संसदीय व्यवस्थेत निवडणूकीच्या राजकारणातही ब-यापैकी यश मिळविले· कॉंग्रेस व इतर समविचारी पक्षांच्या मदतीने त्यांनी दलित चळवळ पुढे नेली· परंतू रिपब्लिकन नेत्यांच्या सतत फूटीमुळे दलित समाज संघटित होण्याऐवजी विखुरला गेला· सत्ताधारी कॉंग्रेस पक्षाशी केलेली आघाडी, नेत्यांतील आपसातील वैयक्तिक हेवेदावे यामुळे डॉ·बाबासाहेबांना अपेक्षित असलेला, तमाम दलितांचे हितसंवर्धन करणारा पक्ष म्हणून रिपब्लिकन पक्ष उभा राहू शकला नाही· हे बाबासाहेबांच्या नंतर दलित संघटनांचे दुर्दैवच म्हणावे लागेल·

प्रकरण तीन मध्ये दलित पँथरच्या राजकीय व्यूहनीतीचा अभ्यास करण्यात आला आहे· रिपब्लिकन पक्षाच्या आत्मघातक फुटीच्या राजकारणामुळे दलितांची संघटित शक्ती कमी झाली· त्यांचे प्रश्न जास्तच गंभीर बनले· दलितांवर सवर्ण उच्चवर्णियाकडून मोठया प्रमाणावर अन्याय होऊ लागले· या अन्यायाला वाचा फोडण्यासाठी 1972 मध्ये नामदेव ढसाळ व राजा ढाले यांच्या नेतृत्वाखाली अमेरिकेतील ब्लॅक पँथरच्या धर्तीवर दलित पँथरची स्थापना करण्यात आली· पँथरने जात, धर्म, वर्ग, वर्ण

UNIVERSITY

या पातळीवर दलितांच्या मुक्तीचे आंदोलन छेडले· वर्ण जातीविरूध्द "महायुध्द" पुकारून सम्यक् क्रांतीचा संकल्प पँथरने अवलंबिला· दलित पँथरने आपल्या लढयांमध्ये वर्ण, वर्ग, जात, धर्म व्यवस्था मोडणा-या सर्व पक्ष व डाव्या शक्तींना बरोबर घेतले· दलित पँथरच्या या व्यापक विचारसरणीतच "बुध्द की मार्क्स" असा वाद सुरू झाला· त्यामुळे काही दिवसातच या चळवळीतच फूट पडली· परंतू पुन्हा प्रा·अरूण कांबळे, रामदास आठवले यांच्या नेतृत्वाखाली दलित पँथरचे भारतीय दलित पँथर असे नामकरण करून पुनरूज्जीवन करण्यात आले· भारतीय दलित पँथरने व्यापक भूमिका घेऊन कार्य केले· परंतू त्यांच्याजवळ निश्चित असा दलित मुक्तीचा कार्यक्रम नसल्याने भारतीय दलित पँथरचा प्रभाव हळूहळू कमी होत गेला· एवढे मात्र खरे की, 1976 नंतरभारतीय दलित पँथरने ग्रामीण व शहरी भागातील तरूणांना संघटीत करून संसदीय व्यवस्थेवर प्रभाव पाडला· महाराष्ट्रात दबावाचे राजकारण करून निवडणूकीच्या राजकारणात जिल्हा परिषद, नगरपालिका या क्षेत्रात आपला ठसा उमटवला·

प्रकरण चारमध्ये बाबासाहेबांचे नातू ॲड·प्रकाश आंबेडकरांच्या भारतीय रिपब्लिकन पक्ष व बहुजन महासंघ यांच्या राजकीय व्यूहनीतीची चर्चा करण्यात आली आहे· 1984 मध्ये प्रकाश आंबेडकरांनी भारतीय रिपब्लिकन पक्षाची पुनर्बांधणी करून आपल्या राजकीय कारकीर्दीला सुरूवात केली· त्यांनी आपल्या राजकीय व्यूहनीतीमध्ये राजकीय जागृतीबरोबर दलितांच्या आर्थिक विकासाच्या कार्यक्रमाचा अवलंब केला आहे· बोध्दांपुरती चळवळ मर्यादित न ठेवता 1990 नंतर समाजातील दलित, श्रमिक, कष्टकरी महिला, अल्पसंख्याक व इतर मागासवर्गीय समाजाचे संघटन करून बहुजन महासंघाची निर्मिती केली आहे· भारिप-बहुजन महासंघाच्या माध्यमातून प्रकाश आंबेडकर मंडल आयोगाच्या शिफारशीप्रमाणे अनुसूचित जाती, जमाती, भटक्या विमुक्त जाती व इतर मागासवर्गीय अशा 85 टक्के बहुजन समाजाला बरोबर घेऊन राजकीय सत्ता हस्तगत करण्याचा प्रयत्न करीत आहेत· 1993 मध्ये अकोला जिल्हयातील स्थानिक स्वराज्य संस्थाची सत्ता व किनवटची निवडणूक जिंकून त्यांनी काही प्रमाणात बहुजनांचे राजकारण

यशस्वी केले· त्यांच्या दबावाच्या राजकारणाचा प्रभाव भारतीय राजकारणावर पडताना दिसतो· 1990 मध्ये जनता दलाने त्यांना राज्यसभेवर निवडून दिले· दलितांबरोबर इतर मागासजातीचा पाठिंबा मिळाल्याशिवाय राजकीय सत्ता मिळणार नाही या दृष्टीने त्यांचा प्रयत्न महत्त्वाचा आहे·

1990 साली दलित जनतेच्या भावनिक रेटयामुळे झालेल्या दलित ऐक्याच्या प्रक्रियेत महाराष्ट्रातील इतर सर्व पक्ष संघटनाबरोबर प्रकाश आंबेडकरही सहभागी झाले होते· परंतू कॉंग्रेसने आजपर्यंत दलितांसाठी काहीच केले नाही ही त्यांची भूमिका होती· त्यामुळे 1990 च्या निवडणूकीत कॉंग्रेस पक्षाशी युती करणे त्यांना मान्य नव्हते· त्यामुळे ऐक्य प्रक्रियेला तडा गेला तरी ते स्वतंत्रपणे सर्व पद्दलितांना बरोबर घेऊन जात आहेत·

प्रकरण पाच मध्ये दलित मुक्तीच्या राजकीय व्यूहनीतीचा टीकात्मक अभ्यास करण्यात आला आहे· डॉ·बाबासाहेब आंबेडकरांनंतर दलित मुक्तीच्या राजकारणात वेगवेगळे सिद्धान्त घेऊन चळवळी उभ्या राहिल्या· रिपब्लिकन पक्षाने काही प्रमाणात दलितांच्या मुक्तीचा विचार केला· दलित पँथरने व भारतीय दलित पँथरने वर्ग आणि जात पातळीवर लढा उभा करून "सम्यक् क्रांती" चा नारा दिला तर भारतीय रिपब्लिकन पक्षाने सर्व शोषितांचे संघटन करण्याचा विचार मांडला म्हणून दलितांबरोबर इतर मागासवर्गीय जातींचा पाठिंबा मिळविण्याचा त्याचा प्रयत्न आहे· त्यांच्या बहुजन महासंघ आणि बहुजन समाज पार्टी यांच्या राजकारणाची तुलनाही येथे केली आहे· बदलत्या राजकीय परिस्थितीत या सर्व पक्ष संघटनांनी दलित मुक्तीचा विचार कशा प्रकारे केला त्याचा टीकात्मक अभ्यास केला आहे·

## टीकात्मक विवेचन

डॉ·बाबासाहेब आंबेडकरांनी दलित मुक्तीचा व्यापक अर्थाने विचार केला होता· त्यांनी दलितांसाठी सेवा, सवलती उपलब्ध करून दिल्या· सर्व शोषितांचे संघठन करून राजकीय सत्तेचे वाटप समाजातील सर्व घटकांपर्यंत पोहोचविले पाहिजे

अशी त्यांची धारणा होती· त्यादृष्टीने बाबासाहेबांच्या निर्वाणानंतर निर्माण झालेल्या पक्ष संघटनांनी ब-यापैकी दलित मुक्तीचा विचारही केला·

प्रथम रिपब्लिकन पक्षाने संसदीय मार्गाचा अवलंब करून दलितांमध्ये जागृती निर्माण केली आणि ब-यापैकी यश संपादित केले· महाराष्ट्रात तर 1962 पर्यंत जवळ जवळ सर्व दलित मते रिपब्लिकन पक्षाला पडत होती· परंतू पक्षातील फूट, बेशिस्त, नेत्यांचा संधीसाधूपणा आणि मुख्य म्हणजे काँग्रेसशी केलेली आघाडी यामुळे रिपब्लिकन पक्षाच्या जुन्या नेत्यांविरुध्द बंड पुकारले आणि दलित चळवळ जास्त आक्रमक पायावर उभी केली· तिला सांस्कृतिक, साहित्यिक आणि वैचारिक अधिष्ठान प्राप्त करून दिले· दलित समाजात स्वाभिमान व आत्मतेज निर्माण करून दलित चळवळ समाजाच्या वेगवेगळ्या घटकात मुरविली पण नेत्यांमधील मतभेद, सत्तेची हाव, संधीसाधूपणा, संघटनेचा अभाव इ·दोषामुळे राजकीयदृष्टया दलित पँथरची चळवळ अपयशी ठरली· भारतीय रिपब्लिकन पक्ष या नव्या नावाने श्री·प्रकाश आंबेडकर यांनी पुन्हा आंबेडकरी चळवळ जास्त व्यापक प्रमाणावर संघटित केली· त्या चळवळीला एक सुंघटित व् व्यापक स्वरूप दिले आणि महाराष्ट्रातील सुसंघटित हितसंबंधी वर्गावर सातत्याने प्रहार केले· 1990 नंतर भारिपला जास्त व्यापक आधारावर उभा करण्याचा त्यांनी प्रयत्न केला आणि त्यातून बहुजन महासंघाचे नवे राजकारण उभे राहिले·

एकंदरीत दलित मुक्तीच्या राजकारणाचा विचार करता असे दिसते की, ऐक्याच्या अभावामुळे आंबेडकरी चळवळीला म्हणावे तेवढे यश मिळू शकले नाही· ग्रामीण भागातील दलित विस्कळीत आहेत· शहरी भागात राहणा-या दलितांचे प्रश्नही गंभीर व गुंतागुंतीचे आहेत· त्यासाठी पुन्हा तमाम पददलितांमध्ये जागृती निर्माण करून जातीयवादी शक्ती, भांडवलदार, सरंजामदार, सावकार यांच्या गुलामगिरीतून दलितांची सुटका करणे गरजेचे आहे· त्यासाठी सर्व दलित पक्ष व संघटनांचे ऐक्य झाले पाहिले· दलितांमध्ये ऐक्याचा अभाव असल्यामुळेच प्रतिगामी शक्ती डोके वर काढीत आहेत· सर्व शोषितांनी एकत्र येऊन नवी पर्यायी राजकीय व्यवस्था निर्माण

केली तरच दलितांचा सर्वांगीण विकास होऊ शकतो· बाबासाहेबांनंतर त्याच्या क्रांतीचे अर्धेच फिरलेले चाक जात आणि धर्माच्या चिखलात रुतलेले आहे· भारतीय समाज व्यवस्थेच्या बदलत्या राजकीय, सामाजिक परिस्थितीच्या संदर्भात क्रांतीचे हे चाक आसासह दलित वर्गाने पूर्णपणे फिरविले पाहिजे· त्यासाठी आता सर्वच पुरोगामी शक्तींनी एकत्र येऊन हे कार्य केले पाहिजे·